# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, वाशिम

# अंतर्गत योजनांचे स्वरुप व माहिती

| अ.क्र. | योजनेचे नांव | स्वरुप |
|---|---|---|
| १ | जननी सुरक्षा योजना (JSY) | या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्रय रेषेखालील महिला लाभार्थीचे बाळंतपण संस्थेत झाल्यास ७ दिवसाच्या आत ग्रामीण भागातील लाभार्थींना रु.७००/- व शहरी भागातील लाभार्थीसाठी रु.६००/- व आपतकालीन परिस्थितीत घरी प्रसुती झाल्यास रु.५००/- तसेच सिझरीनव्दारे प्रसुती झाल्यास लाभार्थीस तज्ञांची फी म्हणून रु.१५००/- अनुदान राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत पीएफएमएस व्दारे लाभार्थ्याच्या खात्यात जमा केले जातात. |
| २ | जननी शिशु सुरक्षा योजना (JSSK) | या योजनेअंतर्गत गरोदर माता, ४२ दिवसापर्यंतच्या स्तनदा माता तसेच ० ते १ वर्षापर्यंतचे आजारी बालकांना मोफत प्रयोगशाळा तपासण्या, औषधोपचार तसेच ॲम्ब्युलंस सुविधा घरापासुन रुग्णालयापर्यंत व रुग्णालयापासुन दुस-या सुसज्ज रुग्णालयापर्यंत व रुग्णालयापासुन घरापर्यंत देण्यात येते. १०२ या टोल फ्री क्रमांकावर गरोदर महिलांना प्रसुतीकरीता मोफत संदर्भसेवा रुग्णवाहीकेव्दारे दिली जाते व १०४ या टोल फ्री क्रमांकावर तज्ञ डॉक्टरांचा सल्ला मोफत दिल्या जातो. तसेच सदर कार्यक्रमांतर्गत माता व नवजात अर्भकांना सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये संपुर्ण मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. यामध्ये गरोदर मातांना प्रसुतीसाठीच्या कोणत्याही खेपेच्या गरोदर स्त्रीस व १ वर्षाच्या आत नवजात अर्भकास सर्व प्रकारच्या आरोग्य विषयी सेवा सर्व शासकीय आरोग्य संस्थामध्ये मोफत देण्यात येतात तसेच या योजनेअंतर्गत सर्व गरोदर मातांची मोफत सोनोग्राफी तपासणी करण्यात येते. |
| ३ | पुर्व लिंग निदान परिक्षण (PCPNDT) | या योजनेअंतर्गत बेटी बचाओ हा उपक्रम राबविण्यात येत असुन अवैद्य गर्भलिंग निदान चाचणीवर बंदी, सोनोग्राफी सेंटरमध्ये "एफ" फार्मची तपासणी केली जाते. गर्भधारणापुर्व आणि प्रसवपुर्व निदानतंत्र (गर्भलिंग निवड प्रतिबंध) कायदा १९९४ नुसार गर्भलिंग तपासणीस बंदी घातलेली असुन सदर कायद्याचे उल्लंघन केल्यास गंभीर स्वरुपाच्या शिक्षेची तरतुद यामध्ये केलेली आहे तसेच गर्भलिंग निदान करणा-या वैद्यकीय व्यावसायिकांवर कायदेशीर कार्यवाही केली जाते. |

| | | |
|---|---|---|
| ४ | सिकलसेल कार्यक्रम (Sickle Cell Prog.) | सिकलसेल हा लाल रक्त पेशीमध्ये होणारा आजार आहे. सर्वसाधारण व्यक्तींच्या शरीरातील लाल रक्त पेशींचा आकार गोल असतो पण सिकलसेल आजारामध्ये या पेशींचा आकार ऑक्सीजन मिळाला नाही तर विळयासारखा होतो. हया आजारास विळयासारखा दिसणा-या (लाल रक्त) पेशींचा आजार म्हणजेच "सिकलसेल आजार" असे म्हणतात. या आजारात रुग्णांना रक्तक्षय होवुन हातापायावर सुज येवुन असहय वेदना होतात व पक्षाघात होतो. या योजनेअंतर्गत १ ते ३० वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांच्या रक्ताची तपासणी शासकीय रुग्णालयात मोफत केली जाते व बाधीत रुग्णांना संदर्भसेवा, औषधोपचार दिल्या जातात तसेच विवाहपुर्व सिकलसेल या आजाराची बाधा नसल्याची खात्री करण्यासाठी शासकीय रुग्णालयात लाभार्थीच्या रक्ताची मोफत तपासणी केली जावुन त्यांना आरोग्य शिक्षण देवुन समुपदेशन केल्या जाते. या कार्यक्रामची जनजागृती करण्याकरीता गांवपातळीवर विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, समाज प्रबोधनासाठी रॅली आयोजीत करण्यात येते. |
| ५ | राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (RBSK.) | जिल्हा शल्य चिकित्सक यांचे नियंत्रणाखाली ग्रामीण व नागरी भागातील वर्ग १ ते १० पर्यंतचे सर्व विद्यार्थ्यांसाठी शाळानिहाय तपासणी केली जाते व त्यांना किरकोळ आजार असल्यास तात्काळ त्याच ठिकाणी औषधोपचार दिला जातो तसेच गंभीर आजारी विद्यार्थ्यांवर संदर्भसेवा देवुन तज्ञ डॉक्टरांकडून शासनाने निर्देशीत केलेल्या सुसज्ज रुग्णालयात Minor व Major सर्जरी केल्या जातात. यामध्ये हृदय शस्त्रक्रिया तसेच इतर महत्वाच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. सर्व आजारी विद्यार्थ्यांना मोफत औषधोपचाराची सुविधा, स्वतःचे आरोग्य चांगले राखण्यासाठी आरोग्य शिक्षण दिले जाते.<br><br>२) RBSK या कार्यक्रमांतर्गत जिल्हयामध्ये तालुकानिहाय एकुण १७ तपासणी पथक कार्यरत आहेत सदर पथकामध्ये वैद्यकीय अधिकारी पुरुष व वैद्यकीय अधिकारी स्त्रि असे दोन वैदयकिय अधिकारी तसेच, एक औषध निर्माण अधिकारी, एक परीचारीका व एक वाहन चालकासह वाहन या प्रमाणे पथक कार्यरत आहे. यामध्ये<br>अ) ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची अंगणवाडी/ शाळेत प्रत्यक्ष आरोग्य तपासणी केली जाते.<br>ब) किरकोळ आजारी बालकावर त्वरीत उपचार करणे.<br>क) शक्यतितक्या लवकर आजाराचे निदान करणे<br>ड) उपचाराची दिशा ठरविणे.<br>इ) शस्त्रकिया आवश्यक असणाऱ्या विद्यार्थांना सदर्भ सेवा देवुन शासनामार्फत शस्त्रक्रिया करवुन घेतल्या जाते. |

| | | |
|---|---|---|
| ६ | रुग्ण कल्याण समिती (RKS) | प्रा.आ.केंद्र, ग्रामीण रुग्णालयाचे ठिकाणी रुग्ण कल्याण समिती स्थानिक जि.प.सदस्य यांचे अध्यक्षतेखाली गठीत करुन या योजनेअंतर्गत प्रत्येक आरोग्य संस्थेला RKS निधी दिला जातो यामधुन AMG व Untied Fund देऊन संस्थेला रुग्णांना आरोग्य सेवा देण्याकरीता औषधी व साहित्य खरेदी केल्या जाते. गंभीर आजारी रुग्णास मोफत संदर्भसेवा देवुन प्रा.आ. केंद्र, ग्रामीण रुग्णालयाचे सुविधेत वाढ करण्यात येते. स्थानिक संस्थेत किरकोळ स्वरुपात दुरुस्ती व बांधकाम असल्यास रुग्णकल्याण समितीच्या मार्फत ठराव घेवुन केले जातात. |
| ७ | नियमित लसीकरण कार्यक्रम (RI Prog.) | या योजनेअंतर्गत आरोग्य संस्थांमध्ये ० ते १६ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना तसेच गरोदर मातांना व स्तनदा मातांना लसीकरणाव्दारे टाळण्याजोगे आजारांवर वेगवेगळया प्रकारच्या लसीव्दारे प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येते. यात निश्चित दिवस, निश्चित स्थळी आरोग्य पोषण व समुपदेशन दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यात बालक व मातांना लसीकरण व आवश्यक तपासण्या करुन जोखमी माता व बालकांना संदर्भसेवा देण्यात येते तसेच दुपारच्या सत्रामध्ये गरोदर व स्तनदा माता तसेच किशोरवयीन मुलींच्या आहाराबाबत उपलब्ध परिस्थितीमध्ये जास्तीत जास्त जिवनसत्वयुक्त आहार कशाप्रकारे घेता येईल याबाबत लाभार्थ्यांना शिकविण्यात येते तसेच इतर ६ राष्ट्रीय कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते. जिल्हयामध्ये नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत पेंटावॅलन्ट लसीचा शुभारंभ दि.२३/११/२०१५ पासुन करण्यात आलेला आहे. पेंटावॅलन्टची १ लस ही ३ वेळा (६ आठवडे, १० आठवडे व १४ आठवडे) द्यावयाची आहे ती ५ रोगांना प्रतिबंध करते. पेंटावॅलन्ट लस बालकांचे घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, हेपिटॉयटिस बी आणि "हिब" (हिमोफीलीस इन्फलुइन्झा टाईप बी) या ५ प्राणघातक रोगांपासून संरक्षण करते. |
| ८ | राष्ट्रीय किशोरवयीन स्वास्थ्य कार्यक्रम (RKSK) | या योजनेअंतर्गत सर्व किशोरवयीन वयोगटातील मुलांमुलींचे प्रजनन व लैंगिक आजार यावर शिक्षण दिल्या जाते त्याकरीता ग्रामीण रुग्णालय मंगरुळपीर,कारंजा,रिसोड व सामान्य रुग्णालय वाशिम येथे आठवडी RKSK Clinic भरविण्यात येते. |
| ९ | पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) | सन २०१६-१७ मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) स्थापीत करण्यात आले असुन तीव्र कुपोषीत बालकांना (SAM) येथे संदर्भीत करुन तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व उपचार करण्यात येतो. सदर सॅम बालकांना पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये २१ दिवसापर्यंत औषधोपचाराकरीता भरती ठेवण्यात येते दरम्यान या कालावधीमध्ये भरती असलेल्या सॅम बालकाच्या आईला त्या कालावधीची बुडीत मजुरी देण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| १० | आयुष कार्यक्रम (AYUSH Prog.) | आयुर्वेद, युनानी, योगा, सिध्द व होमिओपॅथी या जुन्या चिकित्सा पध्दती दिवसेंदिवस लोप पावत आहेत या योजनेअंतर्गत चिकित्सा पध्दती जिवंत ठेवण्यासाठी रुग्णांना हव्या त्या पध्दती मधुन निदान करुन औषधोपचार करण्याची सुविधा या कार्यक्रमांतर्गत करण्यात आली आहे त्यासाठी विषयतज्ञांची नियुक्ती देखील केलेली आहे. |
| ११ | IPHS कार्यक्रम (IPHS Prog.) | या योजनेअंतर्गत सर्व शासकीय संस्थांचे अपग्रेडेशन केल्या जाते त्यांना आयएसओ दर्जा पर्यंत पोहचविल्या जाते त्यामध्ये हवे असलेले वेगवेगळे सर्जन, स्पेशालिस्ट व डॉक्टर उपलब्ध करुन दिल्या जातात तसेच आवश्यकतेनुसार वार्ड, वेगवेगळे कक्षाचे विस्तुत यंत्र सामुग्री, उपकरणे खरेदी करुन उच्च दर्जाची सुविधा पुरविण्यात येते. सदर कार्यक्रमांतर्गत स्थानिक आरोग्य संस्थांचा दर्जा उंचाविण्यात येवुन त्याठिकाणी २४ x ७ आरोग्य सेवा तज्ञ डॉक्टरांकडून दिल्या जातात. |
| १२ | आशा कार्यक्रम (ASHA) | या योजनेअंतर्गत जिल्हयातील प्रत्येक गांवात आरोग्याची कामे करण्याकरीता आशा स्वयंसेविका नियुक्त करण्यात आल्या आहेत त्यांना आवश्यक प्रशिक्षण देवुन तंत्र कौशल्य शिकविण्यात आले आहे. ग्रामस्थांना आरोग्य सेवा स्विकारण्यास प्रोत्साहन देणे त्यांना मदत करणे, धीर देणे, संस्थेत प्रसुतीकरीता गरोदर मातांना प्रवृत्त करुन त्यांना ती सेवा उपलब्ध करुन दिल्या जाते तसेच बालकांचे १०० टक्के लसीकरण होण्याकरीता मदत करणे व इतर सर्व आरोग्य विषयक कामे आशा स्वयंसेविका मार्फत केल्या जातात त्यांना त्यांच्या विविध सेवांच्या बदल्यात शासनाने ठरवुन दिल्याप्रमाणे मोबदला म्हणून मानधन अदा करण्यात येते. |
| १३ | मोबाईल मेडीकल युनिट (MMU) | या संकल्पनेनुसार ज्या गांवात आरोग्य संस्था नाही किंवा जिथपर्यंत आरोग्य सेवा पोहचु शकत नाही अशा दुर्गम वा आदिवाशी भागात जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्थेकडून स्थापण केलेले मोबाईल मेडीकल युनिट हे ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळेस गावामध्ये जाऊन गावातील गरजू लोकांना आरोग्य सेवा देतात. मोबाईल मेडिकल युनीट मध्ये एक महिला वैद्यकीय अधिकारी व एक पुरुष वैद्यकिय अधिकारी अशी त्यांची संपुर्ण टिप असते. सदर टिम हि गरजू लोकांची तपासणी करुन त्यांना वैद्यकीय सल्ला व योग्य तो औषधोपचार स्थानिक स्तरावर दिला जाऊन आवश्यक त्या ठिकाणी संदर्भ सेवा दिली जाते. |

| | | |
|---|---|---|
| १४ | दुर्धर रुग्णांना अर्थसहाय्य योजना | या योजनेअंतर्गत दुर्धर आजारी (किडनीनिकामी होणे, ह्रदयरोग, कर्करोग) रुग्णांना शासण निर्णयामध्ये निर्देशित केलेल्या दवाखान्या मध्ये उपचार घेतलेल्या उपरोक्त निर्देशित केलेल्या आजारी रुग्णांना त्यांच्या दुर्धर आजारा करीता जिल्हा परिषद मधुन अर्थसहाय्य एकदाच दिले जाते, त्याची मर्यादा रु.१५०००/- पर्यंत असते. |
| १५ | कुटुंब कल्याण कार्यक्रम (FW Prog.) | "छोटे कुटुंब सुखी कुटुंब" या संकल्पनेव्दारे १ वा २ किंवा अधिक अपत्ये असलेले कु.क.शस्त्रक्रिया करण्यास पात्र जोडप्यांवर बिनटाका पुरुष नसबंदी व स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया तसेच बिनटाका (लेप्रोस्कोपीक नसबंदी शस्त्रक्रिया) सुविधा सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व सामान्य रुग्णालय मध्ये करण्यात आली आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया लाथार्भीस रु. १४५१/- तसेच स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया केल्यावर रु.२५०/- व रुग्ण अनुसुचीत जाती, जमाती तसेच दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना रु.६००/- अनुदान दिले जाते. |
| १६ | मानव विकास मिशन कार्यक्रम | ही योजना वाशिम जिल्हयामध्ये ४ तालुक्यामध्ये राबविली जात असुन त्यामध्ये वाशिम, रिसोड, मालेगांव व मानोरा हे तालुके येतात. सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्रय रेषेखालील गरोदर मातांना बुडीत मजुरी करीता ९ वा महिना लागताच बाळंतपणा अगोदर रु. २०००/- अनुदान दिले जाते व प्रसुतीनंतर रु.२०००/- असे एकुण रु.४०००/- देण्यात येते. तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची बालरोग तज्ञांकडून तपासणी, गरोदर तसेच स्तनदा मातांची स्त्रीरोग तज्ञांकडून तपासणी व औषधोपचार आरोग्य संस्थामध्ये शिबीरे आयोजीत करुन केली जाते. किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक बाबी व व्यवसाय कौशल्य विकसित करण्याबाबत प्रशिक्षण दिल्या जाते. |
| १७ | प्रेरणा प्रकल्प योजना | जिल्हयात शेतकरी आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीकोनातून प्रेरणा प्रकल्प हा कार्यक्रम आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत शेतीवर अवलंबुन असलेल्या शेतक-यांना नापिकी, नैसर्गिक आपत्ती, कर्ज, कौटुंबीक समस्या, व्यसनाधिनता इत्यादी कारणामुळे नैराश्याची भावना निर्माण होते. याकरीता जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे मानसिक आरोग्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये शेतक-यांना समुपदेशन करण्यात येते तसेच विविध आजारांवर औषधोपचार करण्यात येतात. आशा स्वयंसेविका व्दारा जिल्हयातील प्रत्येक गांवामध्ये सर्व्हेक्षणाव्दारे तणावग्रस्त शेतक-यांना १०४ हया टोलफ्री क्रमांकावर समुपदेशन करण्यात येते. जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शेतकरी मित्र कक्षाची स्थापना करण्यात आली असून शेतक-यांना |

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक ते मार्गदर्शन तसेच समुपदेशन वैद्यकीय अधिकारीव्दारे करण्यात येते. गंभीर आजारी व तीव्र नैराश्य असलेल्या रुग्णांना राजीवगांधी जिवनदायी योजनेअंतर्गत योग्य उपचाराकरीता त्यांना मदत व मार्गदर्शन करण्यात येत आहे. |
| १८ | प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान | हि योजना दर महिन्याला ठरावीक दिवशी राज्यातील सर्व जिल्हे व नगर पालिका महानगर पालिका क्षेत्रात हि योजना राबवीली जाते. वाशिम जिल्हयामध्ये शासनाच्या आदेशानुसार दरमहिन्याला ९ तारखेला सर्व प्रा.आ.केंद्रस्तरावर गरोदर माता (४ थ्या महिन्यापासून पूढील / २ री तीमाही, ३ री तिमाही) यांची तपासणी करुन त्यामधील अति जोखमीच्या माता तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करुन त्यांना आवश्यकतो औषधोपचार देऊन योग्य त्या आरोग्य संस्थामध्ये संदर्भ सेवा दिली जाते. या योजनेचा मूख्य उददेश अतिजोखमीच्या माता शोधून त्यावर योग्य तो औषधोपचार व संदर्भसेवा देऊन सुरक्षीत ठिकाणी प्रसूती करुण माता मृत्यूचे व बालमृत्यु चे प्रमाण कमी करणे हा आहे. |
| १९ | महात्मा फुले जन आरोग्य योजना | महाराष्ट्र शासनामार्फत निवडक व गंभीर आजारांवर दीड लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया केली जाते. पिवळे,केशरी शिधापत्रिकाधारक,अंत्योदय किंवा अन्नपुर्णा पत्रधारक कुटुंब यासाठी पात्र आहेत. तसेच पांढरी शिधापत्रिकाधारक लाभार्थीसुध्दा या योजनेस पात्र असुन त्यांना हमीपत्रावर वा स्वंयघोषीत घोषणापत्रावर कुटुंबामध्ये एकही व्यक्ती सरकारी नोकरीवर नसल्याबाबतचे प्रमाणपत्र द्यावे लागते. या योजनेअंतर्गत निवडक ९७१ आजारावर व १२१ आजारावर लाभ दिल्या जातो. |
| २० | प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना | दि.१/१/२०१७ रोजी किंवा नंतर गरोदर असणा-या किंवा प्रसुत झालेल्या सर्व स्त्रियांना त्यांच्या पहिल्या जिवंत अपत्यासाठी ही योजना लागु राहील. या योजनेअंतर्गत फक्त एकदाच लाभार्थीस लाभ देण्यात येईल. लाभार्थीने व तिच्या पतीने आधार कार्डबाबत माहिती नोंदविणे आवश्यक आहे. लाभार्थीकडे आधारकार्ड नसल्यास ओळखपत्राच्या आधारे पहिला व दुसरा हप्त्याचा लाभ देता येईल. तथापी नोंदणीनंतर ९० दिवसाच्या आत आधार नोंदणी करणे व त्याची प्रत सादर करणे तिसरा हप्ता मिळण्यासाठी बंधनकारक राहील तसेच तिसरा हप्ता मिळण्यासाठी पतीच्या आधारकार्डची प्रत अनिवार्य राहील. या योजनेअंतर्गत कुटुंबातील पहिल्या जिवंत अपत्यापर्यंत त्या महिलेला एकुण रु.५०००/- पर्यंतचे आर्थिक सहाय्य तीन टप्प्यामध्ये अटीची पुर्तता केल्यानंतर ३० दिवसाच्या आत अदा करण्यात येईल. समाजातील सर्व घटकांना ही योजना लागु असेल. सदर योजना फक्त विवाहित महिलांना लागु राहील. सदर योजनेचा लाभ केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या नोकरदार महिलांना लागु असणार नाही. |